**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १७/२०२२ मधील</u>**
**<u>निशाणी क्र. ०१ खालील आदेश</u>**
**<u>MHRT080001452022</u>**

प्रस्तुतचे प्रकरण अतिरिक्त वादमुद्यांसाठी नेमण्यात आलेले आहे. निशाणी क्र. ४८ अन्वये पुर्वी वादमुद्दे निश्चित केले असल्याचे दिसून येते. सदर वादमुद्दे निश्चितीनंतर प्रतिवादी क्र. ०३ ची कैफियत अभिलेखावर वाचून दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे सदर कैफियतीनुसार अतिरिक्त वादमुद्दे निश्चित करणे आवश्यक आहे. पूर्वीचे वादमुद्दे, प्रतिवादी क्र. ०१ व ०२ यांची कैफियत व प्रतिवादी क्र. ०३ यांची कैफियत पाहिली असता, प्रतिवादी क्र. ०१, ०२ व ०३ यांची कैफियत सारखीच असल्याची दिसून येते. त्यामुळे नव्याने कोणतेही अतिरिक्त वादमुद्दे निघत नसल्याचे दिसून येते. परंतु, पूर्वी निशाणी क्र. ४८ अन्वये निश्चित केलेल्या वादमुद्यांमध्ये अनुक्रमांक ०५ ते ०९ कडील वादमुद्यांमध्ये "प्रतिवादी क्र. ०१ व ०२ हे सिध्द करतात काय....” ऐवजी "प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ हे सिध्द करतात काय....” अशी दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

**०२.** तसेच वादमुद्दा क्र. ०८ हा "प्रतिवादी क्र. १ ते ३ हे सिध्द करतात काय की, या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या पुर्वजांचे हक्क अधिकार ठरवून दिलेले होते?” असा काढण्यात आलेला आहे. त्यापुर्वीचा वादमुद्दा क्र. ०७ मध्ये नियमित दिवाणी दावा क्र. ३०/१९४३ चा उल्लेख करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये दिवाणी दावा क्र. ३०/१९४३ मध्ये त्यांच्या पुर्वजांचे हक्कअधिकार ठरवून दिले होते, असे नमुद केले आहे. त्यामुळे वादमुद्दा क्र. ०८ मध्ये "या दाव्यामध्ये" ऐवजी "नियमित दिवाणी दावा क्र. ३०/१९४३ मध्ये" असा मजकूर समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्यानुसार पूर्वीच्या

वादमुद्यांमध्ये तशी दुरुस्ती आजच्या तारखेत करण्यात येत आहे.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.06.10 17:16:55 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

दि. १०/०६/२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवरुख,

देवरुख. जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

Order Below Exh. 01 in R.C.S. No.17/2022

I affirm that the contents of this Pdf file are same words as per original file.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A. A. Shivalkar |
| Court Name | :- | The Court of Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 10/06/2026 |
| Order signed by PO.on | :- | 10/06/2026 |
| Order uploaded on | :- | 10/06/2026 |